# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र.२५६५१४३ E-mail: ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्रं. ०७१२–२५६१६६३


तात्काळ अतिमहत्वाचे

स्मरणपत्र–१

क्र. तंशिसं/विकाना/वृक्षलागवड/२०१३/1448

दिनांक : 20 MAY 2013

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित अभियांत्रिकी
पदविका, पदवी, व पदवीव्युत्तर संस्था,
नागपूर जिल्हा, नागपूर.

विषय :– वृक्ष लागवड संबंधी रोपे लागवडीकरिता खड्डे खोदण्याबाबतची माहिती.
संदर्भ:– क्र. तंशिसं/विकाना/वृक्षलागवड/२०१३/१२६२, दि. ३०/०४/२०१३.

उपरोक्त संदर्भांकिंत विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, विभागीय कार्यालय, नागपूर यांना पाच हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने प्रत्येक संस्थेने १०० वृक्ष लागवडीकरिता तात्काळ खड्डे खोदण्याचे काम व रोपे लागवडीचे काम करावयाचे आहे असे मा. जिल्हाधिकारी यांनी आदेशित केलेले आहे. तरी उपरोक्त संबंधित संस्थानी खालील प्रपत्रात खड्डे खोदल्याबाबतचा अहवाल दिनांक दि. ०९/०५/२०१३ पर्यंत न चुकता ईमेलद्वारे या कार्यालयाला सादर करावयाचा होता परंतु अदयाप पर्यंत ब–याच संस्थानी माहिती दिली नाही.

सदर उपक्रम यशस्वीरित्या पुर्ण करण्यासाठी मा. मुख्यमंत्री व मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी विशेष लक्ष घालून सदर उपक्रम यशस्वी करण्याबाबत आदेशित केले आहे तसेच सदर उपक्रम हा जनहितार्थ व पर्यावरणाशी संबंधीत असल्यामुळे उपक्रम यशस्वी करण्याकरीता आपण विशेष लक्ष घालून उपक्रम यशस्वी करण्याकरीता प्रयत्न करावे. करीता याबाबतचा अहवाल या कार्यालयास त्वरीत पाठवावा.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | संस्थेला वृक्ष लागवडीला दिलेले उद्दिष्ट १०० खड्डे | उद्दिष्टयानुसार प्रत्यक्ष वृक्ष लागवडीकरिता खोदण्यात आलेले खड्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | | | |

उपरोक्त तक्त्यातील माहिती मा. जिल्हाधिकारी कार्यालयाला पुरवायची असल्याने ती त्वरीत सादर करण्यात यावी. तसेच रोपांची माहिती सुध्दा देण्यात यावी. रोपांच्या उपलब्धतेसाठी जवळच्या शासकीय नर्सरी/ जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेशी संपर्क साधावा व वृक्ष लागवडीचे उद्दिष्टय पूर्ण करण्याबाबत सहकार्य करावे.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रत:–
मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.